10:23

gavakari.in/vie\






# सीएमसीएस महाविद्यालयाचा क्विक हीलसोबत करार

**नाशिक : प्रतिनिधी**

**क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत मविप्र समाजाचे ॲड. नामदेवराव माधवराव ठाकरे वाणिज्य, व्यवस्थापन आणि संगणकशास्त्र (सीएमसीएस) महाविद्यालयाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला.**

या अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या वीस विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली. हे विद्यार्थी नाशिक विभागातील विविध शाळा, महाविद्यालयांतील दहा हजार विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे देणार आहेत. तसेच सार्वजनिक ठिकाणीही जनजागृतीचा उपक्रम राबविणार आहेत.

अभियानाचे उद्घाटन क्विक हील फाउंडेशनचे अध्यक्ष अनुपमा काटकर, कार्यकारी संचालक सुगंधा दाणी, व्यवस्थापक अजय शिर्के, महाविद्यालयाचे संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. मधुकर शेलार, प्रा. अमित मोगल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. नाशिक विभागातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. सायबर गुन्हे याविषयी शिर्के यांनी स्पायवेअरपासून सुरक्षित काळजी, सायबर कायद्यातील विविध कलमे व सायबर क्राइमपासून कसे सावध असावे. त्यावरील प्रतिबंधाक उपाय याचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रवींद्रकुमार पाटील आणि मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली क्वीक हील फाउंडेशनबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. तेजल आहेर यांनी केले. सूत्रसंचालन दिशा रोकडे, रिया बिरारीस या विद्यार्थ्यांनी केले. प्रा. शीतल कारे, प्रा. रूपाली वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.